# Positive Story of Nagpur Rural Police

दिनांक १७/१२/२०२५

## बकरी चोरीचे ६ गुन्हे उघड, ५ आरोपी अटक , एक वाहन,बकऱ्या आणि रोख रक्कमेसह ४,८९,५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवनी येथे दिनांक ०५/१२/२०२५ रोजी नयाकुंड व चिचभवन गावातून ०७ बकऱ्या चोरी गेल्याच्या तक्रारीवरून पारशिवानी येथे बकरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण हे सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत असतांना तपासादरम्यान तांत्रिक पुराव्यावरून आरोपीतांनी एका लाल रंगाच्या स्विफ्ट कार मधून बकरी चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराच्या मदतीने सदर गुन्हयात वापरलेली स्विफ्ट कार ही कळमना येथील आरोपी नामे शक्ती शिंदे हा वापरत असून तिचा वापर तो रामटेक पारशिवानी नयाकुंड व नगरधन या परिसरातील बकऱ्या चोरी करण्यासाठी वापरत असल्याबाबत माहिती प्राप्त झाली.

दिनांक १७/१२/२०२५ रोजी आरोपी नामे शक्ती प्रकाश शिंदे यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कळमना येथुन ताब्यात घेऊन त्याच्याकडे सदर गुन्हयाबाबत चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदारांच्या मदतीने केल्याचे कबूल केले तसेच त्याच्याकडे रामटेक पोलीस स्टेशन व पारशिवानी पोलीस स्टेशन हद्दीतील इतर बकरी चोरींच्या गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदाराच्या मदतीने पारशिवणी येथे ३ बकरी चोरीचे गुन्हे तसेच रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत ३ बकरी चोरीचे गुन्हे असे एकुण ६ गुन्ह्याची कबुली दिली. सदर गुन्हयात **१) शक्ती प्रकाश शिंदे, वय २१ वर्ष, रा. गौरीशंकर नगर जुना कामठी, रोड नागपूर, २) संजय शंकर कोहाड,**

**वय २६ वर्ष , रा. दुर्गा किराणा स्टोअर्स जवळ , जुना कामठी रोड नागपूर ,३) मुकेश गोवर्धन शाहू, वय २३ वर्ष , रा. कलमना शनी मंदिर ,पाणीटंकी युथ फोर्स जुना कामठी रोड नागपूर ,४) रोहिदास श्रावण कोळवते, वय ३८ वर्ष राहणार गौरीशंकर नगर , जुना कामठी रोड नागपूर आणि ५) सुमित मुरलीधर दाढे ,वय २५ वर्ष ,रा.गौरीशंकर नगर पवनीकर** यांचे घर समोर जुना कामठी रोड नागपूर यांना कळमना भागतुन सापळा रचुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांकडुन १) एक लाल रंगाची स्विफ्ट कार क्रमांक एम एच ०२ बी जी ९१९९ किंमत ४,००,०००/—, २) चोरीच्या बकऱ्या विक्री करून मिळालेली रोख रक्कम ४४,५००/—, ३) तीन बकऱ्या किंमत १५,०००/— ४) आणि मोबाईल असा एकूण ४,८९,५००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


ASHOK LEYLAND

लोकमत

# बकऱ्या चोरट्यांची टोळी 'एलसीबी'च्या जाळ्यात

## पाच जणांना अटक : नयाकुंड, चिचभवन येथील घटना उघड

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** पारशिवनी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नयाकुंड आणि चिचभवन येथील बकऱ्या चोरीप्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बकऱ्या चोरट्यांच्या टोळीतील पाच जणांना नागपूर शहरातील कळमना भागातून ताब्यात घेत अटक केली. त्यांच्याकडून बकऱ्या चोरीचे सहा गुन्हे उघड झाले असून, एकूण ४ लाख ८९ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई बुधवारी (दि. १७) करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपी चोरट्यांमध्ये शक्ती प्रकाश शिंदे (२१), रोहिदास श्रावण कोळवते (३८), सुमित मुरलीधर दाढे (२५) तिघेही रा. गौरीशंकर नगर, जुना कामठी रोड, नागपूर), संजय शंकर कोहाड (२६, रा. दुर्गा किराणा स्टोअर्स जवळ, जुना कामठी रोड, नागपूर) व मुकेश गोवर्धन शाहू (२३, रा. शनी मंदिराजवळ, जुना कामठी रोड, कळमना, नागपूर) या पाच जणांचा समावेश आहे. नयाकुंड व चिचभवन या गावांमधून ५ डिसेंबर रोजी सात बकऱ्या चोरीला गेल्या होत्या. याप्रकरणी पारशिवनी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता.

या घटनांच्या समांतर तपासात एलसीबीच्या पथकाने तांत्रिक माहिती गोळा केली. बकऱ्या चोरून नेण्यासाठी लाल स्विफ्ट कार वापरल्याचे तपासात आढळून आले. ती कार शक्ती शिंदे याची असल्याचे स्पष्ट होताच एलसीबीच्या पथकाने त्याला बुधवारी नागपूर शहरातील कळमना परिसरातून शिताफीने ताब्यात घेत विचारपूस केली. त्याने गुन्ह्याची कबुली देत साथीदारांची नावे सांगितली. त्यामुळे या पथकाने उर्वरित चार जणांना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेत पाचही जणांना अटक केली. या पाचही आरोपींना पारशिवनी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, या घटनांचा तपास पारशिवनी पोलिस करीत आहेत.

## ४.८९ लाखांचा मुद्देमाल जप्त

या चोरट्यांकडून पारशिवनी व रामटेक पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील बकऱ्या चोरीचे एकूण सहा गुन्हे उघड झाले आहेत. त्यांच्याकडून चार लाख रुपयांची एमएच-०२/बीजी-९१९९ क्रमांकाची कार, चोरून नेलेल्या बकऱ्या विकून मिळालेले ४४ हजार ५०० रुपये, १५ हजार रुपयांच्या तीन बकऱ्या आणि मोबाइल फोन असा एकूण ४ लाख ८९ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. त्यांच्याकडून बकऱ्या चोरीचे इतर गुन्हे उघड होण्याची शक्यताही व्यक्त केली.